स्थापना २८.८.१९८९

'एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ'

सर्वमंगलमाङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके । शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोऽस्तुते ॥

''जनसामान्यांच्या विश्वासाचं प्रतिक''

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ

। वैयक्तिक कर्ज । गृहतारण कर्ज
। वाहन तारण कर्ज । व्यवसाय कर्ज
। वेगवेगळ्या बचत योजना । तत्पर ग्राहक सेवा
। NEFT, RTGS व चेक क्लिअरींग सुविधा
। CBS प्रणाली । कोणत्याही शाखेतून बँक व्यवहार
। एस.एम.एस. बँकींग सुविधा । लॉकर्स सुविधा

२८ वा

वार्षिक अहवाल २०१६-२०१७

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

संचालक-मंडळ (सन २०१६-१७ ते २०२०-२१)

श्री. जयवंतराव बंडू काटकर
संस्थापक

श्री. प्रकाश पाटील
अध्यक्ष

श्री. मनोहर जाधव
उपाध्यक्ष

श्री. हणमंत घनव[illegible]
संचालक

[illegible] सतार
[illegible]

श्री. शंकर शेलवले
संचालक

श्री. हरिश्चंद्र येरूणकर
संचालक

श्री. जगदिश मोरे
संचालक

श्री. भगवान उतेकर
संचालक

श्री. संजय दरेकर
संचालक

श्री. बाळासाहेब सोनजे
संचालक

श्री. शशिकांत शिर्के
संचालक

श्री. राजेंद्र सोनकांबळे
संचालक

सौ. वनिता टिळेकर
संचालिका

सौ. शारदा कर्नाळे
संचालिका

श्री. तुकाराम शेंडे
तज्ञ संचालक

श्री. विजय पाटील
तज्ञ संचालक

श्री. सुनिल घनवट
कार्यकारी संचालक
(मुख्य व्यवस्थापक)

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

पत्ता : १०१ व १०२, साकेत अपार्टमेंट, पहिला माळा, वडवली विभाग, अंबरनाथ (पू.), जि. ठाणे - ४२१५०१.

जा. क्र. - श्री.म.ना.स.प./वा.सर्वसा. सभा नोटीस / /२०१७-२०१८ दि. १५.०७.२०१७

वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना

(फक्त सभासदांसाठी)

स.न.वि.वि.

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ ह्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, पतसंस्थेची सन २०१६-१७ या वर्षाची २८वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ३०.०७.२०१७ रोजी सकाळी १०.०० वा. रोटरी क्लब, वडवली विभाग, अंबरनाथ (पू.) येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी आयोजित करण्यात येत आहे. कृपया सर्व सभासदांनी सभेस उपस्थित रहावे, ही विनंती.

सभेपुढील कामकाजाचे विषय

१) दि. २८/०८/२०१६ रोजी झालेल्या २७व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेल्या अहवालास मान्यता देणे.

३) सन २०१६-१७ या वर्षाच्या मान्य अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा ज्यादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.

४) दि. ३१ मार्च २०१७ रोजी संपलेल्या वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेला ताळेबंद व खर्च-उत्पन्न पत्रकास मान्यता देणे.

५) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफ्याच्या विनियोगास मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.

६) सन २०१७-१८ च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.

७) सन २०१७-१८ या अर्थिक वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणुक करणे व मेहनताना ठरविणे.

८) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणुक करणे व मेहनताना ठरविणे.

९) संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरूस्त्यांना मंजूरी देणे.
(सोबत उपविधी दुरूस्ती प्रकरण जोडले आहे.)

१०) मा. अध्यक्षांचे अनुमतीने, आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

सही/-
सुनिल हणमंत घनवट
कार्यकारी संचालक
(संचालक मंडळाच्या आदेशानुसार)

विशेष सूचना

१) गणसंख्येच्या अभावी सभा तहकुब झाल्यास अशी स्थगीत झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी, अर्ध्या तासानंतर त्याच विषयांवर बोलविण्यात येईल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२) सभेचे कामकाज व्यवस्थित पार पाडता यावे या दृष्टीने, ज्या सभासदांना काही सूचना मांडावयाच्या असतील किंवा प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी आपल्या सुचना अगर प्रश्न सभेच्या ७ दिवस अगोदर लेखी स्वरुपात संस्थेच्या कार्यालयीन वेळेत आणून द्यावेत.

३) सभेस येतांना सभासदांनी आपला अहवाल सोबत आणावा.

४) सभा संपल्यानंतर सभासदांना भोजन व्यवस्था करण्यात आली आहे.

२८ वा वार्षिक अहवाल

सन २०१६-२०१७

सन्माननीय सभासद, ठेवीदार, हितचिंतक बंधू भगिनींनो,

सप्रेम नमस्कार,

आपल्या पतसंस्थेच्या प्रगतीचा २८ वा वार्षिक अहवाल संचालक मंडळाच्या वतीने आपणासमोर सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे.

सहकार क्षेत्रात कार्यरत असताना प्रकर्षाने असे नमुद करू इच्छितो की, सहकार क्षेत्र हे संघटनेच्या माध्यमातून सहकाराच्या उदात्त भावनेतून लोकांच्या हितासाठी लोकांनी केलेले कार्य आहे. माझ्या मते सहकार म्हणजे **स**तत **ह**सतमुखाने **का**र्यात **र**ममाण होणारे व्यक्तिमत्व होय. सहकारात आपले कार्यक्षेत्र, त्या कार्यक्षेत्रातील संधी, महत्वाचे घटक, तेथील ग्राहक या प्रत्येकाचा अभ्यास आणि पुरेशी माहीती घेऊन त्यानुसार संचालक मंडळ धोरणे आखित असते, म्हणुनच आपली श्री महालक्ष्मी ना. सह. पतपेढी अधिक गतीमानतेने पुढे जात आहे. नव्या युगात नवीन तंत्रज्ञानाची लाट आली आहे. ही लाट सर्वदूर पसरली आहे. नव तंत्रज्ञानाच्या वापरापासून कोणतीच व्यवस्था आता दूर राहू शकत नाही. आपली पतसंस्थाही त्याला अपवाद नाही. नव्या तंत्रज्ञानाने आपल्या कामकाजाला वेग आणला, अचुकता आणली, चांगले नियंत्रण आणले, वेळेची बचत, कर्मचाऱ्यांच्या क्रय शक्तीची बचत होत असताना दिसत आहे.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचा आढावा घेताना सर्व संचालक, पदाधिकारी कर्मचारी व दैनंदिन ठेव वसुली प्रतिनिधी यांच्या सहकार्यानेच पतसंस्थेची प्रगती होत असल्याचे स्पष्ट नमूद करावे लागेल. हे आपल्याला पतसंस्थेच्या चढत्या आलेखावरून आपल्या लक्षात येईल. कर्ज व ठेवीच्या विविध योजनांद्वारे ग्राहकांना सर्वोत्तम दर्जाची बँकींग सुविधा देत असताना आपण ६२ कोटींच्या एकूण व्यवसायाचा टप्पा ओलांडला आहे. व्यवसायाची ही वाढ मागील वर्षाच्या तुलनेत १५% आहे. या आर्थिक वर्षातील उल्लेखनीय बाब म्हणजे आपल्या टिटवाळा शाखेचा चढता आलेख! शहाड, आसनगाव, टिटवाळा या ग्रामीण परिसरातुन टिटवाळा शाखेला मिळालेल्या उस्फूर्त प्रतिसादाने टिटवाळा शाखेचा सुमारे ३.५० कोटींचा व्यवसाय झाला आहे. त्यामुळे संचालक मंडळाने व्यावसायिक दुरदृष्टीने सदर शाखेला स्वमालकीचे कार्यालय असावे या उद्देशाने पतसंस्थेने ३६० स्वे.फूट चे शाखा कार्यालय विकत घेतले असुन दि. २१.०३.२०१७ पासुन टिटवाळा शाखा आपल्या स्ववास्तूत कार्यारत आहे. डोंबिवली शाखा वगळता आपली सर्व शाखा कार्यालये स्ववास्तूत कार्यारत आहेत ही एक

उल्लेखनीय बाब आहे. भविष्यात डोंबिवली शाखेकरीता स्वत:चे कार्यालय घेण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे. आपण सर्व सभासद, ठेवीदार व हितचिंतकांच्या अभेद्य विश्वासामुळे हे सहज शक्य होणार असून संचालक मंडळ हे विश्वस्तांच्या भूमिकेतून हे साध्य करणार यात शंका नाही.

कर्ज व ठेवीच्या विविध योजनांद्वारे.....

ग्राहकांना सर्वोत्तम दर्जाची बँकींग सुविधा देता देता....

आपण **६२ कोटींचा टप्पा** ओलांडून....

ठाणे जिल्ह्यातील **अग्रगण्य आर्थिक** संस्था बनलो आहे.

तत्पर व प्रशिक्षित कर्मचारी वर्गाच्या माध्यामातून

आणि **कोअर बँकींग** सारख्या

आधुनिक प्रणालीद्वारे चालणारे कामकाज

तज्ञ व सर्वच बाबतीत **जागृत संचालक मंडळ**

आणि सहकार्य करणारे ग्राहक,

यामुळेच आपण यशस्वी

ठरलो आहोत.

शाखा निहाय सांपत्तीक स्थिती -

शाखा	भाग भांडवल	ठेवी	कर्जे	व्याज वसुल
अंबरनाथ	२,३९,५०,४९०.००	१८,६५,२७,१६०.००	११,४८,९०,३२०.००	१,४६,४३,९८३.००
बदलापूर	------------	९,०८,४०,८५९.००	८,७२,६८,०४४.००	१,१७,६४,३३७.००
डोंबिवली	------------	१,४६,४६,६०३.००	१,५९,६६,२५२.००	१६,०५,९८९.००
कल्याण	------------	३,०४,६६,१८९.००	१,६७,५७,६९५.००	२३,१४,८३५.००
टिटवाळा	------------	१,९२,६६,५४४.००	१,७५,४६,६५७.००	२०,८६,५७१.००

आर्थिक वर्ष २०१६-१७ आढावा - सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात सर्व सभासद व ठेवीदार यांच्या भरघोस पाठींब्यावर आपल्या संस्थेस प्रगती साधता आली हे खालील तुलनात्मक आकडेवारीवरुन स्पष्ट होते.

तपशील	२०१५-२०१६	२०१६-२०१७	% वाढ
अ) जबाबदाऱ्या			
१) भागभांडवल	२३०.९९	२३९.५०	३.६८%
२) स्वनिधी	१८३.४७	२१५.५२	१७.४६%
३) ठेवी	२९६१.१३	३४१७.४७	१५.४१%
४) निव्वळ नफा	३६.८५	४१.४६	१२.५१%
ब)मालमत्ता			
१) कर्जे	२२५०.८३	२५२४.२८	१२.१४%
२) गुंतवणुक	९५०.५७	१२०४.५३	२६.७१%
३) कायम व इतर मालमत्ता	११४.४२	१४८.७५	३०.००%
क) उत्पन्न			
१) मिळालेले व्याज	४४१.०६	४२०.९१	-४.५६%
२) इतर उत्पन्न	५.५७	१६.०९	१८८.६३%
ड) खर्च			
१) दिलेली व्याजे	३०८.५४	३१४.७६	२.०१%
२) सेवक पगार व भत्ता	२२.०१	२७.९६	२७.०४%
३) इतर खर्च	२४.५१	२९.९९	२२.३५%
४) तरतुदी	५४.७२	२३.१२	-५७.७४%
इ) इतर बाबी			
१) प्रती सेवकामागे व्यवसाय	१९१.४१	२१९.६६	१४.७५%
२) उत्पन्नाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	१२.९६	११.०६	-१.९०
३) खर्चाचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	१०.३०	९.४२	-०.८८
४) निव्वळ नफ्याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण	१.०६	१.०४	-०.०२

१) सभासद व भागभांडवल - आपल्या संस्थेची सभासद संख्या दि. ३१ मार्च २०१६ अखेर ४०६५ इतकी होती. त्यामध्ये अहवाल साली २८४ नवीन सभासद करून घेण्यात आले. पैकी २३८ सभासदांनी त्यांच्या सभासदत्वांचे राजीनामे दिल्याने या वर्षाअखेरीस ४१११ एकुण सभासद आहेत.

पतसंस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु. ५ कोटी असून अहवाल वर्षात भाग-भांडवलात लक्षणीय वाढ झाली आहे. मागील वर्षी पतसंस्थेचे वसूल भागभांडवल रुपये २,३०,९९,०१०.०० होते. त्यामध्ये ३.६८% वाढ होऊन अहवाल वर्ष अखेरीस वसूल भाग भांडवल रुपये २,३९,५०,४९०.०० जमा झालेले आहे.

२) स्वनिधी - अहवाल सालाच्या सुरूवातीस राखीव निधी व इतर निधी मिळून रूपये १,८३,४७,७११/- जमा होते. सन २०१६-१७ अखेरीस त्यात रू. ३२,०४,७३९/- ने वाढ होऊन एकूण रूपये २,१५,५२,४५०/- इतका स्वनिधी जमा आहे.

३) ठेवी - पतसंस्थेविषयी असलेला विश्वास हा ठेवींच्या आकड्यांमध्ये प्रतीत होतो. पतसंस्थेच्या ठेवी गतवर्षी रु. २९,६१,१३,३६५/- होत्या. त्यामध्ये १५.४१% वाढ होऊन वर्ष अखेर एकूण ठेवी रु. ३४,१७,४७,३५५/- झाल्या आहेत. संस्थेच्या विविध ठेव योजनांमध्ये आपण सामील होऊन आपल्या विकासाबरोबर संस्थेच्या विकासास हातभार लावा.

अ. क्र.	ठेव प्रकार	दि. ३१.०३.१६ अखेर शिल्लक	दि. ३१.०३.१७ अखेर शिल्लक	ठेवीदार	वाढ/घट	वाढ/घट
१	मुदत ठेव	१०,९५,९७,७७०.००	१३,४१,७१,४४५.००	२३५५	२,४५,७३,६७५.००	२२.४२%
२	दामदुप्पट ठेव	१,२४,४३,३०८.००	१,५१,९७,४७८.००	४०७	२७,५४,१७०.००	२२.१३%
३	मासिक मिळकत ठेव	४,३५,०९,४१०.००	५,३८,०७,३१२.००	५४५	१,०२,९७,९०२.००	२३.६६%
४	ओमकार ठेव	२,२२,९१,७१८.००	२,१२,३५,९५२.००	३२९	-१०,५५,७६६.००	-४.७३%
५	लखपती ठेव	२२,७३,७५३.००	२५,४५,१७५.००	१००	२,७१,४२२.००	११.९३%
६	जनविकास ठेव	४९,१४,०३९.००	७५,८४,०५०.००	११९५	२६,७०,०११.००	५४.३३%
७	इच्छापूर्ती ठेव	१,९८,५६०.००	१,६८,१४७.००	१३	-३०,४१३.००	-१५.३१%
८	बालविकास ठेव	३,०५,१२७.००	२,९८,७७४.००	३९	-६,३५३.००	-२.०८%
९	पेंशन ठेव	३,२२,००५.००	४,७६,५९९.००	११	१५४,५९४.००	४८.००%
१०	मासिक ठेव	४२,२५,८०३.००	४५,०३,८३४.००	६१६	२,७८,०३१.००	६.५७%
११	एजंट सुरक्षा ठेव	१,३४,९३८.००	१,४०,३४८.००	४६	५,७१०.००	४.२३%
१२	लॉकर डिपॉझिट	---	४,३०,०००.००	३४	४,३०,०००.००	१००%
१३	बचत ठेव	८१,६६,४४०.००	९५,५१,६८६.००	२४२८	१३,८५,२६४.००	१६.९६%
१४	दैनंदिन ठेव	८,७७,३०,४९४.००	९,१६,३६,२५५.००	८०४४	३९,०५,७६१.००	४.४५%
	एकूण	२९,६१,१३,३६५.००	३४,१७,४७,३५५.००	१६,१६२	४,५६,३३,९९०.००	१५.४१%

४) कर्जवाटप - कर्जवसुली - गतवर्षी रुपये २२,५०,८३,१७४/- कर्ज येणे बाकी होते. अहवाल वर्षात विविध प्रकारचे जामीनकी व तारणी कर्ज रू. १९,९१,२२,२३४/- वाटप केले असून अहवाल वर्षात रू. १७१७७६४४०/- इतके कर्ज वसूल झाले आहे. दि. ३१.०३.२०१७ अखेर रू. २५,२४,२८,९६८/- इतके कर्ज येणे बाकी आहे. अहवालसाली गतवर्षीपेक्षा १२.१४% कर्जवाटपात वाढ झाली आहे. तसेच संस्थेचे कर्ज व ठेवीचे प्रमाण (C. D. Ratio) ६२.९९% इतके आहे.

थकीत कर्जवसुलीकडे विशेष लक्ष देण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न असतो. सर्व प्रकारचे उपाय करून सुद्धा वसुली न झाल्याने नाईलाजाने काही थकीत कर्जदार व त्यांचे जामीनदार यांच्यावर कठोर कारवाई करावी लागते. सहकारी कायद्यातील कलम ९१ व १०१ अंतर्गत दि. ३१.०३.२०१६ अखेर ६६ वसुली दाखल्यांची कारवाई चालू होती. अहवाल सालामध्ये नवीन १९ वसुली दाखले प्राप्त झाले. एकूण वसुली दाखल्यांपैकी ५२ वसुली दाखल्यांची रक्कम रू. ५९,४८,६९६/- वसूल झाली असून अहवाल सालाअखेर ३३ वसुली दाखल्यांची वसुलीची अंमलबजावणी सुरू आहे. कर्ज वसुलीचे कामकाज जलदगतीने होण्याकरीता ठाणे जिल्हा नागरी / पगारदार सहकारी पतसंस्था फेडरेशन लि. ठाणे यांनी मोलाचे सहकार्य केले.

५) गुंतवणुक - सुरक्षितता व विश्वासार्हता या पार्श्वभूमीवर तरलतेपोटी विविध शेड्युल व मोठ्या सहकारी बँकांमध्ये अहवाल साला अखेर रूपये १२,०४,५३,७६३/- मुदतठेवीमध्ये गुंतवणूक करण्यात आली आहे. संस्थेने राखीव निधीची दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. ठाणे या बँकेत १००% गुंतवणूक केली आहे.

६) नफा व नफा विभागणी - अहवाल वर्षात पतसंस्थेस एकूण खर्च व तरतुदी वजा जाता **रु. ४१,४५,४८०.६९** नफा झाला असून मागील वर्षाचा शिल्लक नफा रु. १४०४.५९ होता. म्हणजेच एकूण **नफा रु. ४१,४६,८८५.२८** इतका झाला आहे. सहकार खाते यांच्या सुचना आणि नियमानुसार एकूण नफ्याची विभागणी संचालक मंडळाने सुचविली आहे. त्यास मान्यता मिळावी अशी विनंती मी, संचालक मंडळाच्या वतीने आपणा सर्वांस करीत आहे.

१)	राखीव निधी २५ %	रु.	१०,३६,३७०.००
२)	लाभांश १० %	रू.	२३,०९,९०१.००
३)	लाभांश समीकरण निधी	रु.	२७,०००.००
४)	सभासद कल्याण निधी	रु.	२५,०००.००
५)	कर्मचारी कल्याण निधी	रु.	३३,५००.००
६)	सहकार शिक्षण प्रशिक्षण निधी	रू.	६५,०००.००
७)	गुंतवणुक चढ-उतार निधी	रु.	५०,०००.००
८)	संशयीत व बुडीत कर्ज निधी	रु.	६,००,०००.००
	शिल्लक नफा	रु.	११४.२८
	एकूण	**रु.**	**४१,४६,८८५.२८**

७) संचालक मंडळ - संचालक मंडळाच्या वर्षभरात एकूण १२ सभा झाल्या आहेत. संस्थेचे दैनंदिन कामकाज पोटनियमांना अनुसरून व सहकारी कायद्याच्या तरतुदीनुसार होण्याच्या दृष्टीकोनातून संस्थेच्या कार्यालयात नियमित येऊन सेवक वर्गाबरोबर योग्य ती सल्लामसलत करून कामकाज हाताळीत असतात. सहकार क्षेत्रात होणारे अमुलाग्र बदल स्विकारून, संस्थेची उज्वल परंपरा राखणे, संस्थेस प्रगतीपथावर नेणे व सर्वसामान्य समासदांच्या आर्थिक अडचणींचे निवारण करणे या उद्दीष्टांसाठी संचालक मंडळ सदैव कार्यरत असते.

८) कर्मचारी प्रशिक्षण - आधुनिक तंत्रज्ञानात होणारे बदल तसेच, नियमांत वारंवार होणारे बदल यानुसार आपले ज्ञान व माहिती अद्ययावत रहावी, या हेतूने प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येते. अहवाल वर्षात प्रा. शांताराम पाध्ये सर व प्रा. श्री. खैरनार या तज्ञ मार्गदर्शकांनी प्रशिक्षण कार्यक्रमात ग्राहक सेवा, कर्ज व निधी व्यवस्थापन, सहकारी कायदा व इतर कायदे या विषयांवर बहुमोल मार्गदर्शन केले या प्रशिक्षण कार्यक्रमास सर्व संचालक, कर्मचारी वर्ग व दै./मा. ठेव वसूली प्रतिनीधी हजर होते.

९) जनता अपघात विमा - पतसंस्थेने आपल्या सर्व इच्छुक सभासदांसाठी व कर्जदारांसाठी दि ओरिएण्टल, इन्श्युरंन्स कंपनी लि. च्या माध्यमातून वैयक्तिक जनता अपघात विमा पॉलिंसी अंतर्गत विमा उपलब्ध करून दिला आहे. या पॉलिसीची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे....

१) किमान रू. १,००,०००/- व कमाल रू. ५,००,०००/- पर्यंत अपघात विमा संरक्षण उपलब्ध.

२) रक्कम रू. ५,००,०००/- च्या विम्यासाठी तीन वर्षाकरीता रू. ८१०/- हप्ता.

३) कोणत्याही कागदपत्रांची आवश्यकता नाही. कुठल्याही प्रकारच्या वैद्यकिय तपासणीची गरज नाही.

१०) ग्राहक सेवा - सुविधा - सभासद ग्राहकाला बँकींग मधील सर्व सेवा सुविधा एकाच छताखाली उपलब्ध

करण्याच्या दृष्टीकोनातून पतसंस्थेने लॉकर्स सुविधा आर.टी.जी.एस्. (RTGS) व एन्.इ.एफ्.टी. (N.E.F.T.) सुविधा व एस्.एम्.एस्. (SMS) बँकींग सुविधा सुरू करण्यात आल्या आहेत.

१) लॉकर्स सुविधा - पतसंस्थेने आपल्या अंबरनाथ व बदलापूर या शाखा कार्यालयात लॉकर्स सुविधा (SAFE DEPOSIT VAULT) उपलब्ध करून देण्यात आली आहे. जेणेकरून ग्राहकांना महत्वाचे दस्तेएवज, मौल्यवान वस्तू यांना सुरक्षितता प्राप्त होईल. याचा सर्व सभासद व खातेदारांनी लाभ घ्यावा.

२) आर.टी.जी.एस्. (RTGS) **व एन्.इ.एफ्.टी.** (NEFT) **-** आपल्या पतसंस्थेने आपल्या ग्राहकाला एका खात्यातुन दुसऱ्या बँकेच्या खात्यात रकमा वर्ग (ट्रान्सफर) करण्यासाठी आय.सी.आय.सी.आय. या बँकेच्या माध्यमातुन आर.टी.जी.एस. व एन्.इ.एफ्.टी. ची सुविधा सुरू करण्यात आली आहे.

३) एस्.एम्.एस्. बँकीग सुविधा - पतसंस्था नवनवीन तंत्रज्ञान अवगत करीत असताना, ग्राहकांस अधिकाधिक सेवा पुरविण्याच्या उद्देशाने पतसंस्थेच्या विविध योजना, कार्यक्रमाची माहीती, खात्यात जमा नावे होणाऱ्या रकमा, कर्ज हप्ता भरण्याच्या तारखा यांची माहीती ग्राहकांना मोबाईलवर एस्.एम्.एस्.द्वारे त्वरीत उपलब्ध करून देण्याची सुविधा सुरू करण्यात आली आहे. तरी ग्राहकांनी आपले मोबाईल नंबर आपल्या शाखेत नोंदवावेत.

११) श्रद्धांजली - अहवाल सालामध्ये देशातील थोर नेते, सामाजिक कार्यकर्ते, साहित्यिक, शास्त्रज्ञ, जवान, सहकार तज्ञ, आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार, हितचिंतक अशा थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

१२) आभार व ऋणनिर्देश - आपल्या पतसंस्थेस वेळोवेळी ज्या-ज्या व्यक्तिंनी सहकार्य दिले त्यांचा ऋणनिर्देश करणे क्रमपात्र ठरेल. मा. श्रीमती. लाटकर मॅडम विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, मा.श्री. डी. बी. उढाण जिल्हा उपनिबंधक सह. संस्था ठाणे, (तत्कालिन), मा.श्री. शहाजी पाटील जिल्हा उपनिबंधक सह संस्था ठाणे, मा. श्री. सुधाकर मोहीते, सहाय्यक निबंधक सह. संस्था अंबरनाथ तालुका मा. श्री. जी. बी. ठाकूर मा. सहाय्यक निबंधक सह. संस्था कर्जत तालुका यांनी पतसंस्थेस भेट देऊन बहुमुल्य मार्गदर्शन करून प्रोत्साहीत केले. या मान्यवरांची संस्था ऋणी आहे. मा.अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई, ठाणे जिल्हा नागरी / पगारदार सह. पतसंस्था फेडरेशनचे मा.अध्यक्ष, सचिव, व्यवस्थापक अशोक काळे, विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री. प्रकाश निकम, मा. श्री. एच्. जी. शेटे, माजी प्राचार्य मुंबई जिल्हा सहकारी बोर्ड लि., मा.श्री.पी.के.कापडणीस व मा. श्री. व्ही. व्ही. देसाई निवृत्त मुख्याधिकारी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या., पुणे यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्याबद्दल आभार.

मा. दादासाहेब नलावडे माजी नगराध्यक्ष अंबरनाथ नगरपरीषद, मा. श्री. रामराव मोरे सर माजी मुख्याध्यापक भाऊसाहेब परांजपे विद्यालय, तसेच पोलीस स्टेशन अंबरनाथ, बदलापूर व कल्याण व डोंबिवली यांनी वसुलीकामी विशेष सहकार्य केल्याबद्दल आभार. पतसंस्थेची संगणक कार्यप्रणाली कार्यन्वित करणारे नेटविन सिस्टीम्स ॲन्ड सॉफ्टवेअर आणि अधिकारी वर्ग, दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि., दि सारस्वत को. ऑप. बँक लि., डोंबिवली ना. सह. बँक लि., कल्याण जनता सह. बँक लि., शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि., अभ्युदय सहकारी बँक लि., अंबरनाथ जयहिंद को. ऑप .बँक लि., देना बँक लि., बँक ऑफ बडोदा, ठाणे जनता सहकारी बँक लि. तसेच कार्यक्षेत्रातील सर्व सह. पतसंस्था यांचे पदाधिकारी व कर्मचारी वर्गाचे सहकार्याबद्दल आभार.

अंतर्गत हिशोब तपासनीस मा. श्री. आर. के. पाटील (प्रमाणित लेखापाल) व त्यांचे अधिकारी यांनी संस्थेच्या दैनंदिन कामकाजात वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबद्दल मी खास ऋण व्यक्त करतो.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संचालक, कर्मचारी, ठेव प्रतिनिधी, सभासद, ठेवीदार आणि हितचिंतक यांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संस्थेने यशस्वी वाटचाल केली आहे या सर्वांचा मी व्यक्तिशः आभारी आहे.

जयहिंद ! जय सहकार !!

आपला

श्री. प्रकाश शंकर पाटील (अध्यक्ष)

श्री महालक्ष्मी नागरी सह. पतपेढी मर्या. अंबरनाथ

ताळेबंद

रक्कम रु. २०१५-१६	जबाबदाऱ्या व देणे		रक्कम रु. २०१६-१७
५,००,००,०००.००	**अधिकृत भाग भांडवल**		५,००,००,०००.००
२,३०,९९,०१०.००	वसुल भाग भांडवल		२,३९,५०,४९०.००
६२,८७,८७९.००	**राखीव निधी**		७२,५१,२५०.००
१,२०,५९,८३२.००	**इतर निधी**		
३५,५५,७८४.००	इमारत निधी	४१,६७,१८२.००	
९९,६९७.००	लाभांश समीकरण निधी	१,१९,६९७.००	
९६,०००.००	सभासद कल्याण निधी	१,१६,०००.००	
५०,०००.००	गुंतवणूक चढ-उतार निधी	७५,०००.००	
२७,०००.००	धर्मदाय निधी	२७,०००.००	
६९,०००.००	कर्मचारी कल्याण निधी	९६,०००.००	
१,५०,०००.००	निवडणूक निधी	१,०९,८५०.००	
६४,९६,१७१.००	संशयीत व बुडीत कर्ज निधी	७६,९५,१७१.००	
१,९३,००८.००	थकीत कर्ज व्याज निधी	१,९३,००८.००	
८,००,०००.००	कर्मचारी ग्रॅच्युइटी निधी	१०,१६,०००.००	
५,१२,०००.००	उत्तम जिंदगी तरतुद	६,३७,०००.००	
११,१७२.००	सहकार प्रशिक्षण निधी	४९,२९२.००	१,४३,०१,२००.००
२९,६१,९३,३६५.००	**ठेवी**		
१०,९५,९७,७७०.००	मुदत ठेव	१३,४१,७१,४४५.००	
१,२४,४३,३०८.००	दामदुप्पट ठेव	१,५१,९७,४७८.००	
४,३५,०९,४१०.००	मासिक मिळकत ठेव	५,३८,०७,३१२.००	
२,२२,९१,७१८.००	ओंमकार ठेव	२,१२,३५,९५२.००	
८,७७,३०,४९४.००	दैनंदिन ठेव	९,१६,३६,२५५.००	
४२,२५,८०३.००	मासिक ठेव	४५,०३,८३४.००	
४९,१४,०३९.००	जनविकास ठेव	७५,८४,०५०.००	
३,०५,१२७.००	बालविकास ठेव	२,९८,७७४.००	
३३,७५,६०,०८६.००	एकूण बेरीज पुढील पानावर चालू		४,५५,०२,९४०.००

पत्रक (दि. ३१.०३.२०१७ अखेर)

रक्कम रु. २०१५-१६	मालमत्ता व येणे		रक्कम रु. २०१६-१७
१०,१३,००१.००	**रोख शिल्लक**		८,९९,५४३.००
९४,९८,२९८.५९	**बँक शिल्लक**		४२,५५,०९६.२८
९,५०,५७,७६३.००	**गुंतवणूक**		
५,०००.००	भाग	५,०००.००	
६२,१२,३००.००	राखीव निधी	७३,१२,३००.००	
८,८८,४०,४६३.००	मुदत ठेवी	११,३१,३६,४६३.००	१२,०४,५३,७६३.००
२२,५०,८३,१७४.००	**कर्जे**		
	विनातारणी कर्ज		
८,२२,०५,००४.००	मध्यम मुदत कर्ज	८,०१,९८,७१२.००	
२,०८,४६०.००	व्यवसाय कर्ज	१,४५,९८०.००	
२,४३,२९५.००	तातडीचे कर्ज	२,८५,१६३.००	
२३,६५,३२६.००	नाममात्र सभासद कर्ज	२५,१०,४६९.००	
	तारणी कर्ज		
८९,३४,७०३.००	गृहतारण कर्ज	१,५९,९८,०९५.००	
८,३३,९६,७७२.००	व्यवसायिक (मॉर्गेज) कर्ज	९,५०,०६,६३७.००	
२,०३,८८,४५६.००	सोने तारण कर्ज	२,३८,५१,३५६.००	
५१,८५,६२३.००	वाहन तारण कर्ज	६०,०२,२४६.००	
२,०६,७१,९४१.००	मुदत ठेव तारण कर्ज	२,५४,४०,७२०.००	
४,४४,९१३.००	दैनंदिव ठेव तारण कर्ज	३,२९,२३३.००	
६,५०,५३०.००	वस्तू खरेदी तारण कर्ज	८,०९,४१०.००	
१,९१,१५१.००	एन्. एस. सी. तारण कर्ज	२,२३,७७७.००	
१,९७,०००.००	कर्मचारी मध्यम मुदत कर्ज	१,४९,९७९.००	
----	कर्मचारी गृहकर्ज	१४,७७,१९१.००	२५,२४,२८,९६८.००
८२,८२,३७१.००	**स्थावर मालमत्ता (इमारत)**		१,०७,२३,३३४.००
३३,८९,३४,६०७.५९	एकूण बेरीज पुढील पानावर चालू		३८,८७,६०,७०४.२८

ताळेबंद

रक्कम रु. २०१५-१६	जबाबदाऱ्या व देणे		रक्कम रु. २०१६-१७
३३,७५,६०,०८६.००	मागील पानावरुन		४,५५,०२,९४०.००
१,९८,५६०.००	इच्छा पूर्ती ठेव	१,६८,१४७.००	
२२,७३,७५३.००	लखपती ठेव	२५,४५,१७५.००	
८१,६६,४४०.००	बचत ठेव	९५,५१,६८६.००	
१,३४,९३८.००	एजंट सुरक्षा ठेव	१,४०,६४८.००	
३,२२,००५.००	पेंशन ठेव	४,७६,५९९.००	
----	लॉकर डिपाझिट	४,३०,०००.००	३४,१७,४७,३५५.००
३३,०२,४३१.००	**देणी व तरतुदी**		
१,२१,३६६.००	ऑडीट फी	२,१०,०००.००	
२,७०,०००.००	सानुग्रह अनुदान	२,१५,३९२.००	
१२,४४,५३५.००	कर्मचारी भविष्य नि. निधी	१६,०७,५९९.००	
३०,०००.००	व्यवसाय कर	३०,०००.००	
५२५.००	निवडणूक अनामत	----	
५१,०३१.००	टि.डी.एस्.	३५,६५७.००	
३६,७९८.००	मुक्ताई सागर पतसंस्था	----	
१,११,६८१.००	अंतर्गत लेखा परी. फी.	१,५०,१८१.००	
११,८१,५४५.००	लाभांश	१६,३२,९७५.००	
२,०७,२८५.००	अनामत	९९,०३६.००	
४७,६६५.००	सभासद विमा खाते	१०,२५८.००	३९,९१,०९८.००
३६,८५,४७९.५९	**नफा**		
१,०८६.५८	शिल्लक नफा (सन १४-१५)	१,४०४.५९	
३६,८४,३९३.०१	चालु नफा (सन १५-१६)	४१,४५,४८०.६९	४१,४६,८८५.२८
३४,४५,४७,९९६.५९	एकूण		३९,५३,८८,२७८.२८

पत्रक (दि. ३१.०३.२०१७ अखेर)

रक्कम रु. २०१५-१६	मालमत्ता व येणे	रक्कम रु. २०१६-१७
३३,८९,३४,६०७.५९	मागील पानावरुन	३८,८७,६०,७०४.२८
२१,५६,९०४.००	फर्निचर व डेडस्टॉक	३२,२३,९७८.००
२,७६,९७०.००	संगणक प्रणाली	२,३३,७३६.००
२९,४९६.००	वाहन खरेदी	२६,५४६.००
४,५०,०००.००	कार्यालय डिपॉझिट	४,५०,०००.००
२,३०,०००.००	स्टेशनरी साठा	२,००,५००.००
९,५००.००	टेलिफोन अनामत	९,५००.००
२,४४०.००	वीज अनामत	२,४४०.००
२९,६००.००	मुद्रांक शुल्क	३०,२४०.००
५,०००.००	बी. इ. एस्.टी. अनामत	५,०००.००
२७,९७८.००	१०१ कारवाई खर्च	----
४,८०,८२२.००	इन्कम टॅक्स	५,९१,५९२.००
१०,१४,१०९.००	ॲडव्हांस	३,४५,९३८.००
८,९८,३४७.००	गुंतवणुकीवरील व्याज	५,२१,०७१.००
३७३.००	बँक टि.डी.एस्.	२,६०४.००
१,८५०.००	भारत गॅस डिपॉझिट	१,८५०.००
----	बँक कॅश क्रेडीट कर्ज	९,८२,५७९.००
३४,४५,४७,९९६.५९	एकूण	३९,५३,८८,२७८.२८

श्री. सुनिल ह. घनवट	श्री. मनोहर पां. जाधव	श्री. प्रकाश शं. पाटील
(कार्यकारी संचालक)	(उपाध्यक्ष)	(अध्यक्ष)

उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२०१६ ते ३१/३/२०१७ अखेर

रक्कम रूपये २०१५-१६	खर्च		रक्कम रूपये २०१६-१७
	अ) व्याज खर्च		
२,५९,१३,९१२.००	१) ठेवीवरील व्याज	२,६२,७७,७४७.००	
२८,४६३.४९	२) बँक चार्जेस	३७,०३३.८१	
----	३) बँक कर्ज व्याज	६,६५९.००	
४९,११,८३४.००	४) दैनंदिन ठेव कमिशन	५१,५५,०८४.००	३,१४,७६,५२३.८१
	ब) व्यवस्थापकीय खर्च (ब-१)		
२१,६०,९५९.००	१) सेवक पगार	२७,५७,६२८.००	
४०,४४०.००	३) कर्मचारी गणवेश	३९,०८०.००	२७,९६,७०८.००
	ब-२)		
१५,६९७.००	१) पोस्टेज खर्च	१५,६५३.००	
४१,३८९.००	२) स्थावर मालमत्ता विमा खर्च	६२,६१८.००	
६८,६७३.००	३) संगणक/इन्व्हरर्टर देखभाल दुरुस्ती	१,३८,२००.००	
१,५८,७७०.००	४) वीज बील	१,७७,२०८.००	
१,२५,१२६.००	५) टेलीफोन बिल	१,१८,५२८.००	
२,३०,०४३.००	६) कार्यालय भाडे	२,४३,७००.००	
११,८००.००	७) मालमत्ता कर	१५,७०१.००	
४,३५६.००	८) इलेक्ट्रीक मेंटनंस्/पाणीबील	५,४८४.००	७,७७,०९२.००
	ब-३)		
७५,०००.००	१) अंतर्गत लेखा परिक्षण फी	१,००,०००.००	
१,२०,०००.००	२) शासकिय लेखा परिक्षण फी	२,९३,६४९.००	
१८,५००.००	३) गुमास्ता लायसन / ट्रेड सर्टिफिकेट फी	४,८००.००	
२,८६,१९०.००	४) सॉफ्टवेअर सर्व्हीस चार्जेस	३,३५,७००.००	
१०,७३६.००	५) प्रोफेशनल फी	५४,७००.००	७,८८,८४९.००
३,४२,२१,८८८.४९	एकूण बेरीज पुढील पानावर चालू		३,५८,३९,१७२.८१

उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२०१६ ते ३१/३/२०१७ अखेर

रक्कम रूपये २०१५-१६	उत्पन्न		रक्कम रूपये २०१६-१७
	क) मिळालेले व्याज		
३,६०,३९,३११.००	१) कर्ज व्याज वसुल	३,२४,१५,७१५.००	
८०,६७,२१७.००	२) बँक गुंतवणूक व्याज	९६,७५,३६९.००	
३७.५०	३) लाभांश बँक	१५०.००	४,२०,९१,२३४.००
	ख) इतर उत्पन्न		
५५,११६.००	१) नोटीस फी	४४,२५५.००	
४,००,१९९.००	२) प्रोसेसिंग फी	१४,२८,६९१.००	
१,०२,३७७.००	३) सेवा शुल्क	८०,५६९.००	
----	४) लॉकर भाडे	२३,८८४.००	
----	५) १०१ कारवाई खर्च	३२,५३६.००	१६,०९,९३५.००
४,४६,६४,२३७.५०	एकूण बेरीज पुढील पानावर चालू		४,३७,०१,१६९.००

उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२०१६ ते ३१/३/२०१७ अखेर

रक्कम रूपये २०१५-१६	खर्च		रक्कम रूपये २०१६-१७
३,४२,२१,८८८.४९	मागील पानावरुन		३,५८,३९,१७२.८१
	ब-४) घसारा खर्च		
२,१२,३६९.00	१) स्थावर मालमत्ता	२,२२,१९६.00	
२,३९,६५७.00	२) फर्निचर व फिक्चर	३,५८,३६४.00	
६९,२४२.00	३) संगणक	५८,४३४.00	
३,२७७.00	४) वाहन	२,९५०.00	६,४१,९४४.00
	क) छपाई, जाहीरात व देणगी खर्च		
६१,00६.00	१) सामाजिक उपक्रम	२६,६८0.00	
८000.00	२) जाहीरात खर्च	३२,७८0.00	
१,३९,४५२.00	३) छपाई लेखन साहीत्य	१,५३,३२५.५0	
१,000.00	४) ठाणे जि. ना./प. सह. पत. फेड. वर्गणी	----	
---	५) मुख्यमंत्री सहाय्यता निधी	५,000.00	२,१७,७८५.५0
	ड) इतर खर्च		
४५,000.00	१) मासिक सभा भत्ता	४२,९00.00	
१,0३,१९४.00	२) वार्षिक सर्वसाधारण सभा (अहवाल छपाईसह)	१,७९,६६३.00	
३,000.00	३) सचिव मानधन	----	२,२२,५६३.00
	ड-२)		
१,0८,५२७.00	१) किरकोळ खर्च	१,७२,९८३.00	
२९,२२७.00	२) प्रवास खर्च	३८,३७६.00	
१४,४३३.00	३) कर्जवसुली खर्च	१७,५३0.00	
७,९८0.00	४) वाहन मेंटनंस	६,९९0.00	२,३५,८७९.00
३,५२,६७,२५२.४९	एकूण बेरीज पुढील पानावर चालू		३,७१,५७,३४३.३१

उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२०१६ ते ३१/३/२०१७ अखेर

रक्कम रूपये २०१५-१६	उत्पन्न	रक्कम रूपये २०१६-१७
४,४६,६४,३३७.५०	मागील पानावरुन	४,३७,०१,१६९.००
४,४६,६४,३३७.५०	एकूण बेरीज पुढील पानावर चालू	४,३७,०१,१६९.००

उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२०१६ ते ३१/३/२०१७ अखेर

रक्कम रूपये २०१५-१६	खर्च		रक्कम रूपये २०१६-१७
३,५२,६७,२५२.४९	मागील पानावरुन		३,७१,५७,३४३.३१
	ड-३)		
३८,४७८.००	१) दसरा/लक्ष्मीपूजन खर्च	३७,७१०.००	
----	२) शाखा उद्‌घाटन खर्च	४६,९२०.००	
२,०१,६७९.००	३) ऑफिस मेंटनंस खर्च	२,७५,११५.००	३,५९,७४५.००
	इ) तरतुदी		
१,१०,७६१.००	१) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी	१,२२,५४५.००	
१,०८,६५५.००	२) कर्म. भ. नि. निधी व्याज	१,२०,०५४.००	
२,८१,११९.००	३) सानुग्रह अनुदान	१,५६,०००.००	
४०,७०,०००.००	४) संशयीत व बुडीत कर्ज निधी	७,९९,०००.००	
१,०२,०००.००	५) उत्तम जिंदगी तरतूद	१,२५,०००.००	
८,००,०००.००	६) कर्मचारी ग्रॅज्युइटी निधी	२,१६,०००.००	
----	७) इमारत निधी	५,००,०००.००	२०,३८,५९९.००
	ई) नफा		
३६,८४,३९३.००	शिल्लक नफा ताळेबंदाकडे वर्ग		४१,४५,४८०.६९
४,४६,६४,३३७.५०	एकूण		४,३७,०१,१६९.००

उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२०१६ ते ३१/३/२०१७ अखेर

रक्कम रूपये २०१५-१६	उत्पन्न	रक्कम रूपये २०१६-१७
४,४६,६४,३३७.५०	मागील पानावरुन	४,३७,०१,१६९.००
४,४६,६४,३३७.५०	एकूण	४,३७,०१,१६९.००

श्री. सुनिल ह. घनवट (कार्यकारी संचालक)

श्री. मनोहर पां. जाधव (उपाध्यक्ष)

श्री. प्रकाश शं. पाटील (अध्यक्ष)

सन २०१७-१८ चे अंदाज पत्रक

मागील सन २०१६-१७ या वर्षाचा अंदाज व प्रत्यक्ष साध्य दर्शवुन पुढील सन २०१७-१८ चे अंदाज पत्रक आपल्या मंजुरीसाठी ठेवताना आम्हांस अत्यानंद होत आहे. तसेच अंदाजपत्रकीय मंजुरीपेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजूरी मिळावी ही विंनीती.

अ. क्र.	तपशील	सन २०१६-२०१७		२०१७-२०१८ चा अंदाज
		अंदाज	साध्य	
	जबाबदाऱ्या व देणी			
१)	वसूल भाग भांडवल	२,५०,००,०००.००	२,३९,५०,४९०.००	२,५०,००,०००.००
२)	राखीव व इतर निधी	२,२०,२५,०००.००	२,१५,५२,४५०.००	२,५०,००,०००.००
३)	सभासद ठेवी	३४,०५,००,०००.००	३४,१७,४७,३५५.००	४०,००,००,०००.००
४)	इतर देणी व तरतुदी	४५,००,०००.००	३९,९१,०९८.००	४८,००,०००.००
५)	एकुण नफा	४१,४७,०००.००	४१,४६,८८५.२८	४६,५०,०००.००
	एकूण	**३९,६१,७२,०००.००**	**३९,५३,८८,२७८.२८**	**४५,९४,५०,०००.००**
	मालमत्ता व येणी			
६)	रोख व बँक शिल्लक	१,२५,२२,०००.००	६१,३७,२१८.२८	९९,५०,०००.००
७)	गुंतवणूक	११,१०,००,०००.००	१२,०४,५३,७६३.००	१३,००,००,०००.००
८)	सभासद कर्जे	२५,६०,००,०००.००	२५,२४,२८,९६८.००	३०,२५,००,०००.००
९)	कायम व इतर मालमत्ता	१,५०,००,०००.००	१,४८,७५,०३४.००	१,५५,००,०००.००
१०)	इतर येणी	१६,५०,०००.००	१४,९३,२९५.००	१५,००,०००.००
	एकूण	**३९,६१,७२,०००.००**	**३९,५३,८८,२७८.२८**	**४५,९४,५०,०००.००**
	उत्पन्न			
११)	सभासद कर्ज व्याज	३,५०,००,०००.००	३,२४,१५,७१५.००	३,७०,००,०००.००
१२)	बँक गुंतवणुक व्याज	८५,२५,०००.००	९६,७५,५१९.००	९७,००,०००.००
१३)	इतर उत्पन्न	६,००,०००.००	१६,०९,९३५.००	१०,५०,०००.००
	एकूण	**४,४१,२५,०००.००**	**४,३७,०१,१६९.००**	**४,७७,५०,०००.००**
	खर्च			
१४)	सभासद ठेव व्याज	२,५०,००,०००.००	*** २,६२,७७,७४७.००**	२,७५,००,०००.००
१५)	कर्मचारी वेतन व भत्ते	३२,००,०००.००	२७,५७,६२८.००	३०,००,०००.००
१६)	दै. ठेव कमिशन - प्रतिनिधी	५३,२०,०००.००	५१,५५,०८४.००	५६,००,०००.००
१७)	बँक कर्ज व्याज व चार्जेस	३०,०००.००	*** ४३,६९२.८१**	७०,०००.००
१८)	उद्‌घाटन खर्च	----	*** ४६,९२०.००**	७०,०००.००
	एकूण बेरीज पुढील पानावर चालू	**३,३५,५०,०००.००**	**३,४२,८१,०७१.८१**	**३,६२,४०,०००.००**

अ. क्र.	तपशील	सन २०१६-२०१७		२०१७-२०१८ चा अंदाज
		अंदाज	साध्य	
	मागील पानावरून	**३,३५,५०,०००.००**	**३,४२,८१,०७१.८१**	**३,६२,४०,०००.००**
१९)	कर्मचारी गणवेश	६५,०००.००	३९,०८०.००	६५,०००.००
२०)	सहकार प्रशिक्षण खर्च	२०,०००.००	---	---
२१)	राज्य/जिल्हा सह.पत.फेड.वर्गणी	२,०००.००	---	६,०००.००
२२)	पोस्टेज टेलीग्राम	२५,०००.००	१५,६५३.००	३०,०००.००
२३)	स्था. मा. विमा. खर्च	६५,०००.००	६२,६१८.००	२,६५,०००.००
२४)	संगणक/इन्व्हर्टर/वाहन देखभाल दुरूस्ती	२,००,०००.००	१,५०,६७४.००	२,००,०००.००
२५)	वीज बील	२,००,०००.००	१,७७,२०८.००	२,००,०००.००
२६)	टेलीफोन बिल	१,५०,०००.००	१,१८,५२८.००	१,५०,०००.००
२७)	कार्यालय भाडे	२,००,०००.००	*** २,४३,७००.००**	२,००,०००.००
२८)	मालमत्ता कर	७५,०००.००	१५,७०१.००	५०,०००.००
२९)	शासकिय/अंतर्गत हि.त.फी./ टी.डी.एस. रिटर्न चार्जेस	३,००,०००.००	२,९३,६४९.००	३,५०,०००.००
३०)	जाहीरात / सामाजिक उपक्रम	१,००,०००.००	५९,४६०.००	१,००,०००.००
३१)	छपाई लेखन साहित्य	३,५०,०००.००	१,५३,३२५.५०	२,१०,०००.००
३२)	मासिक / वार्षिक सर्व साधारण सभा	२,२८,०००.००	२,२२,५६३.००	२,५०,०००.००
३३)	किरकोळ खर्च	१,२५,०००.००	*** १,७२,९८३.००**	१,८९,०००.००
३४)	प्रवास / कर्जवसुली खर्च	६५,०००.००	५५,९०६.००	७५,०००.००
३५)	दसरा / लक्ष्मीपूजन खर्च / पूजाखर्च	५०,०००.००	३७,७१०.००	५०,०००.००
३६)	ऑफीस मेंटनंन्स खर्च	२,५०,०००.००	*** २,७५,११५.००**	३,००,०००.००
३७)	ट्रेड सर्टिफिकेट	२०,०००.००	४,८००.००	३०,०००.००
३८)	घसारा	६,५०,०००.००	६,४१,९४४.००	७,२५,०००.००
३९)	तरतुदी	२९,३५,०००.००	२१,३८,५९९.००	३०,००,०००.००
४०)	प्रोफेशनल फी	२८,०००.००	*** ५४,७००.००**	६०,०००.००
४१)	सॉफ्टवेअर सर्व्हिस चार्जेस	३,२५,०००.००	*** ३,३५,७००.००**	३,५०,०००.००
४२)	मुख्यमंत्री सहाय्यता निधी	----	*** ५,०००.००**	५,०००.००
	नफा	४१,४७,०००.००	४१,४५,४८०.६९	४६,५०,०००.००
	एकूण	**४,४१,२५,०००.००**	**४,३७,०१,९६९.००**	**४,७७,५०,०००.००**

श्री. सुनिल ह. घनवट
(कार्यकारी संचालक)

श्री. मनोहर पां. जाधव
(उपाध्यक्ष)

श्री. प्रकाश शं. पाटील
(अध्यक्ष)

अंतर्गत लेखा परिक्षकांचा अहवाल

आम्ही श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ या संस्थेच्या सोबत जोडलेल्या सन २०१६-२०१७ च्या तेरीज, उत्पन्न-खर्च पत्रक व ताळेबंदाचे लेखा परिक्षण केले असून अहवाल करतो की,

१) आमच्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती माहिती व खुलासे उपलब्ध करुन दिलेले आहेत.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थाचा १९६० चा कायदा व नियम आणि संस्थेच्या पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) आम्ही तपासलेले तेरीज, उत्पन्न-खर्च पत्रक व ताळेबंद संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकांशी व विवरण पत्रांशी जुळत आहेत.

४) आमच्या मते आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणे तसेच आम्हाला देण्यात आलेल्या खुलाशावरुन हे हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्थांचा सन १९६० चा कायदा व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी माहिती देतात.

स्थळ : अंबरनाथ

दिनांक : ३१/०५/२०१७

सही/-

आर.के.पाटील

(प्रमाणित लेखापाल)

नमुना 'एन-२'

लेखापरिक्षकांचा अहवाल

(कलम ८१ आणि नियम ६९ (३) पहा)

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्य कार्यकारी अधिकारी,

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पत. संस्था मर्या., अंबरनाथ.

मुख्य कार्यालय :

संदर्भ : ठराव क्र. ८ अधिमंडळांची बैठक दि. २८/८/२०१६

आर्थिक विवरण पत्रकाबाबत वैधानीक लेखापरीक्षकांचा अहवाल

१. आम्ही श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अंबरनाथ मुख्य कार्यालय अंबरनाथ, ता. अंबरनाथ, जि. ठाणे या संस्थेचे दि. १/४/२०१६ ते दि. ३१/३/२०१७ या वर्षातील आर्थिक विविरण पत्रकांचे लेखापरीक्षण केलेले असून त्यामध्ये दि. ३१/३/२०१७ या दिनांकाचा ताळेबंद व या सहकारी वर्षाचे नफा तोटा पत्रक आणि त्यामध्ये समाविष्ट केलेल्या हिशोबाच्या धोरणाचा अर्थपूर्ण सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश आहे.

आर्थिक विवरण पत्रकाबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्या अंतर्गत बनविलेले नियमान्वये आर्थिक विविरणपत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. सदय जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना अपहार किंवा चूक यामुळे होणाऱ्या लक्षणिय चुकांपासून मुक्त राहतील अशा प्रकारचे अंतर्गत नियंत्रण ठेवणेबाबत संकल्पना तयार करणे व ते अंमलात आणणे याचा समावेश असेल.

लेखापरीक्षकाची जबाबदारी

३. आर्थिक हिशोबपत्रके बनविणे ही संस्थेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असून त्यावर मत प्रदर्शन करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरिक्षण हे भारतीय सनदी लेखापाल संस्था यांनी तयार केलेल्या प्रचलीत तपासणीसाठी लागू असलेले मानदंड व महाराष्ट्र सहकारी संस्था

कायद्यास अनुसरून केलेले आहे. या मानदंडानुसार आम्हाला आमच्या तपासणीची आखणी आणि अंमलबजावणी अशा प्रकारे करावी लागते की, ज्या योगे ह्या हिशोबात लक्षणीय चुका नाहीत ह्याची सर्वसाधारण खात्री पटेल.

४. लेखापरिक्षेमध्ये लेखापरीक्षणमधील जे उघड न केलेले आणि रक्कम यातील पुरावा जमा करण्याची पद्धत आहे व लेखापरीक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे. यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरणपत्रका मधील धोक्याचे निर्धारण करण्याची पद्धत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेले आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनियोजनेच्या वापराची पद्धत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरीक्षेमध्ये जमा खर्चाच्या मूल्यांकनाच्या विनियोजनेचा वापर आणि जमा खर्चाचा अंदाज त्याचप्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरणपत्रकाचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

५. आमच्या लेखापरीक्षणासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती सर्व माहिती, पुरावे व खुलासे आम्हाला उपलब्ध आहेत.

अभिप्राय

६. आमच्या मते आणि आम्हांस मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे व आवश्यक असलेल्या माहितीच्या आधारे सदर संस्थेचे हिशोब व एकत्रित दिलेल्या टिपणी या महाराष्ट्र सहकारी संस्थांचा १९६० चा कायदा. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व इतर लागू असलेल्या कायद्यानुसार तसेच संस्थासाठी लागणारे निबंधकाने वेळोवेळी जारी केलेले परीपत्रकानुसार आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे वापरली जाणारी हिशोबी तत्वानुसार सत्य व रास्त स्थिती दर्शवितात आणि

१) ताळेबंदाच्या बाबतीत दिनांक ३१/०३/२०१७ ची संस्थेची स्थिती आणि

२) नफा तोटा पत्रकाचे बाबतीत या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या अगर मुदतीच्या संस्थेच्या नफ्याची आमच्या सोबत जोडलेल्या लेखापरीक्षण अहवाल विभाग 'अ' 'ब' व 'क' मध्ये केलेल्या अवलोकनास पात्र राहुन सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

इतर कायदेशीर आणि नियामक बाबींवरील अहवाल

७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार ताळेबंद व नफा तोटा पत्रक तयार करणेत आलेली आहेत.

८. आम्ही अहवाल देतो की ;

(अ) लेखापरीक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती सर्व माहिती व खुलासे आम्हाला उपलब्ध झाले आहेत व ते पुरेसे आहेत.

(ब) आमच्या तपासणीतून जितपत दृष्टोपत्तीस येईल त्याप्रमाणे संस्थेने केलेले व्यवहार हे संस्थेच्या अधिकार मर्यादेच्या आतील आहेत.

(क) आमच्या लेखापरिक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून आलेली विवरणपत्रे योग्य व परीपूर्ण आहेत.

९. आमच्या मताप्रमाणे ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक यांचे अनुपालन लेखांकन मानकाप्रमाणे आहे.

१०. आम्ही आणखी अहवाल देतो की ;

(१) या अहवालासंदर्भात ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे हिशोबाची पुस्तके व विवरणपत्रकानुसार जुळतात.

(२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टीपत्तीस येईल त्यावरून संस्थेने कायद्यानुसार आवश्यक अशी योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

(३) संस्थेच्या हिशोबांची तपासणी करून कार्यालयाकडून आलेले अहवाल हे आमचा लेखापरीक्षण अहवाल तयार करताना योग्य त्या ठिकाणी विचारात घेण्यात आलेले आहेत.

(४) संस्थेस चालू लेखापरीक्षण कालावधीसाठी ऑडीत वर्ग ''अ'' देण्यात येत आहे.

लेखापरीक्षण तालिका क्रमांक :

स्थळ : अंबरनाथ

दिनांक : २८/०६/२०१७

सही/-

मे. मनोज सणस (C.A.)

(सनदी लेखापाल)

* उपविधी दुरूस्ती नमुना *

आदर्श उपविधी	मूळ उपविधी	दुरूस्त उपविधी	दुरूस्तीची कारणे
अ) प्रस्तावना	संस्थेचे कार्यक्षेत्र : संस्थेचे कार्यक्षेत्र ठाणे जिल्हा यांच्या भौगोलिक क्षेत्रापुरते मर्यादित राहील	संस्थेचे कार्यक्षेत्र : संस्थेचे कार्यक्षेत्र ठाणे जिल्हा व पालघर जिल्हा यांच्या भौगोलिक क्षेत्रापुरते मर्यादित राहील	पतसंस्थेचे सन २000 साली सध्याच्या पालघर जिल्ह्यासह ठाणे जिल्हा कार्यक्षेत्र मंजुर झाले आहे. संस्थेने सन २000 पासून अजपर्यंत पालघर जिल्ह्यासह सभासद व कर्ज व्यवहार केला असल्याने..... शासनाच्या धोरणानुसार जिल्हा विभाजन झाल्यामुळे कार्यक्षेत्रात असलेला पालघर जिल्हा समाविष्ट करणे निकडीचे आहे.
नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांचे ''आदर्श उपविधी'' (२०१३) ५४ – कर्जव्यवहार सदर उपविधी स्विकृती झाल्यापासून नागरी / ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांसाठी कर्जाविषयक व कर्ज प्रकार निहाय कमाल	क. कर्जाचा प्रकार — कमाल कर्ज मर्यादा १. सामान्य कर्ज — रू. १,00,000 पर्यंत २. तारणी कर्ज क) स्थावर तारण (गृहबांधणी / फ्लॅट खरेदी कर्ज) कर्ज स्थावर मुल्यांकनाच्या ७५% पर्यंत आणि स्वनिधीच्या १५% पेक्षा जास्त नाही यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम	क. कर्जाचा प्रकार — कमाल कर्ज मर्यादा १. सामान्य कर्ज — रू. १,५0,000 पर्यंत २. तारणी कर्ज क) स्थावर तारण (गृहबांधणी / फ्लॅट खरेदी कर्ज) कर्ज स्थावर मुल्यांकनाच्या ८0% पर्यंत आणि स्वनिधीच्या १५% पेक्षा जास्त नाही यापैकी जी रक्कम कमी असेल ती कर्ज रक्कम	सभासदांच्या मागणीनुसार.... सभासदांच्या वाढत्या मागणीवरून.... तसेच पोटनियमातील सध्याच्या तरतुदीनुसार होणारी कर्ज रक्कम व मुल्यांकन यातील दुरावा कमी करण्यासाठी व संस्थेच्या तारणी (सुरक्षित) कर्जामध्ये वाढ होण्यासाठी आणि इतर वित्तीय संस्थांशी अनुरूप असण्यासाठी ......

✻ उपविधी दुरूस्ती नमुना ✻

आदर्श उपविधी	मूळ उपविधी	दुरूस्त उपविधी	दुरूस्तीची कारणे
कर्ज मर्यादा खालील प्रमाणे असेल. परिशिष्ट ''क–३''	ड) व्यावसायिक कर्ज स्थावर तारण मुल्यांकन किमतीच्या ७०% एवढे आणि स्वनिधीच्या १५% पेक्षा जास्त नाही यापैकी कमी असेल ती कर्ज रक्कम	ड) व्यावसायिक कर्ज स्थावर तारण मुल्यांकन किमतीच्या ८०% एवढे आणि स्वनिधीच्या १५% पेक्षा जास्त नाही यापैकी कमी असेल ती कर्ज रक्कम	सभासदांच्या वाढत्या मागणीवरून.... तसेच पोटनियमातील सध्याच्या तरतुदीनुसार होणारी कर्ज रक्कम व मुल्यांकन यातील दुरावा कमी करण्यासाठी व संस्थेच्या तारणी (सुरक्षित) कर्जामध्ये वाढ होण्यासाठी आणि इतर वित्तीय संस्थांशी अनुरूप असण्यासाठी ......

✲ सभासदांसाठी मार्गदर्शक सूचना व नियम ✲

१) ज्या व्यक्तीस संस्थेत खाते उघडावयाचे असेल अशा व्यक्तीने दोन पासपोर्ट साईज फोटो व वास्तव्याचा शासनमान्य पुरावा देणे आवश्यक आहे. (KYC)

२) कोणत्याही प्रकारच्या कर्जासाठी अर्जदार सभासदाला किमान दोन जामीनदारांची आवश्यकता आहे. पैकी एक सरकारी नोकर असावा. (ही अट ठेव तारण कर्ज, सोने तारण कर्ज व शासकीय प्रमाणपत्र तारण कर्ज या कर्जास लागू नाही.)

३) कर्जदार किंवा त्यांचे जामीनदार कोणत्याही प्रकारचे थकबाकीदार असता कामा नये.

४) कर्ज अर्ज सादर करतेवेळी अर्जदार व जामीनदारांनी आपले पगारपत्रक, उत्पन्नाचा दाखला, रेशनिंग कार्ड, विद्युत बिल, घरभाडे पावती, आधारकार्ड, पासपोर्ट आकाराचा फोटो ही कागदपत्रे सोबत जोडली पाहिजेत व तारण कर्जाविषयी तारण मालमत्तेची आवश्यक ती सर्व कागदपत्रे किंवा व्यवस्थापक / शाखाधिकारी जी कामदपत्रे मागतील ती दिली पाहीजेत.

५) प्रत्येक कर्ज हप्ता भरतेवेळी सभासदाने आपले कर्ज पासबूक आणून त्याची नोंद वेळेवेळी करून घेणे आवश्यक आहे. पास बुकाशिवाय आर्थिक व्यवहार हाताळला जाणार नाही.

६) कर्जदाराने कर्जाचे हप्ते, ठरवुन दिलेल्या तारखेच्या आत भरावेत. त्यानंतर येणाऱ्या हप्त्यावर थकबाकीच्या २% इतकी रक्कम दंडव्याज म्हणुन आकारण्यात येईल.

७) संस्थेने कार्यान्वित केलेल्या विविध कर्ज व ठेव योजनांचा प्रत्येक सभासदाने लाभ घ्यावा.

८) संस्थेकडून केवळ कर्ज काढणे हा उद्देशन ठेऊ नका, तर आपल्या मिळकतीतुन नियमित काही बचत करण्याची सवय लावुन घ्या व संस्थेच्या व आपल्या उन्नतीस हातभार लावा. प्रत्येक सभासदाने देण्याघेण्याचा व्यवहार करतेवेळी पासबुक सोबत आणणे अत्यावश्यक आहे.

९) संस्था वैयक्तिक जामिनकी, वाहन तारण, गृहतारण, सोनेतारण, राष्ट्रीय बचत प्रमापत्र तारण, किसान विकास प्रमाणपत्र तारण, विमा पॉलीसी तारण, मुदत ठेव तारण, व्यवसाय कर्ज इत्यादी प्रकारची कर्ज देत आहे. अधिक माहीतीसाठी व्यवस्थापक / शाखाधिकारी यांचेशी संपर्क साधावा.

१०) कर्ज मागणी अर्ज करताना सभासदाने आपण दुसऱ्या थकबाकीदारास जामीन नाही याची खात्री करून घेतल्यानंतर अर्ज सादर करावा.

११) कर्ज घेण्याचे कारण व जामीनदारांची पात्रता विचारात घेऊन सभासदास कर्ज मंजुर करण्यात येते.

१२) थकबाकीदारांनी प्राथमिक नोटीस मिळताच, संस्थेशी संपर्क साधुन सहकार्य करावे व न्यायालयीन कारवाईतून होणारी असुविधा टाळावी अन्यथा वकील फी न्यायालयीन खर्च इत्यादी खर्चास पात्र व्हाल.

१३) कर्जदाराने आपले हप्ते नियमित भरावेत आणि जामीनदारांनी आपण जामीन असलेल्या व्यक्ती कर्जाचे हप्ते नियमित भरतात की नाही याची वेळेवेळी चौकशी करणे आवश्यक आहे.

१४) सभासदांनी बदललेला राहण्याचा पत्ता, नोकरी व व्यवसायाचा पत्ता, बदललेले नांव किंवा बदललेला कायदेशीर वारस वेळच्यावेळी संस्थेला कळविला पाहिजे.

१५) संस्थेकडे जमा असणाऱ्या ठेवीवर कर्ज हवे असल्यास, ठेवीच्या जमा रकमेवर ९०% कर्ज ठेवीच्या व्याजदरापेक्षा २% अधिक व्याजदराने त्वरीत मिळू शकेल.

१६) ज्या सभासदांचे बचत खाते संस्थेत नाही अशा सभादसांनी ती उघडून घ्यावी, जेणेकरून आपला लाभांश त्यामध्ये जमा करणे शक्य होईल.

१७) ज्या सभासदांनी सन २०१३-१४ चा लाभांश घेतला नसल्यास तो घेऊन जावा अन्यथा तो राखीव निधीत जमा केला जाईल याची नोंद घ्यावी.

१८) पतसंस्थेच्या प्रत्येक ग्राहकाने आपला मोबाईल क्र. पतसंस्थेत नोंदवावा जेणेकरून सदर मोबाईल क्र. आपल्या खात्याशी सलग्न करता येईल. आपणांस एस्.एम्.एस्. सुविधा मिळेल.

१९) वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांच्या १० वी, १२ वी व पदवी परिक्षा प्रथम प्रयत्नात पास झालेल्या मुलांचा सत्कार आयोजित केला आहे. त्यासाठी अशा विद्यार्थ्यांची नावे संस्थेच्या कार्यालयात त्यांच्या प्रमाणपत्राच्या प्रतीसह दिनांक २२.०७.२०१७ पुर्वी नोंदणे आवश्यक आहे.

बक्षिसपात्र विद्यार्थ्यांनी स्व:त उपस्थित राहुन बक्षिसाचा स्विकार करावा. त्यांच्या पालकांस अथवा प्रतिनिधीस बक्षीस स्विकारता येणार नाही.

दि. २१.३.२०१७ टिटवाळा शाखेचा स्ववास्तूत स्थलांतर उद्घाटन समारंभा प्रसंगी
मा.सौ. उपेक्षा भोईर (नगरसेविका, क.डों.म.पा.)
मा.सौ. सश्मिरी भांगे (सहकारी अधिकारी प्रथम श्रेणी, अंबरनाथ),
मा. [illegible]तराव काटकर साहेब (संस्थापक, श्री महालक्ष्मी ना.सह.पतपेढी मर्या.) व
मा[illegible]श पाटील (अध्यक्ष, श्री महालक्ष्मी ना.सह.पतपेढी मर्या.) व इतर मान्यवर

✲ अधिकारी वर्ग ✲

श्री. पांडुरंग श्री. पाटील
शाखाधिकारी,
अंबरनाथ

सौ. अनिता प्र. भोसले
(B.Com.)
शाखाधिकारी, बदलापूर

सौ. सुनंदा वि. जरारे
(B.Sc.)
शाखाधिकारी, कल्याण

सौ. मधुरा म. दाबके
(B.A.)
शाखाधिकारी, टिटवाळा

सौ. वैशाली द. घाडगे
शाखाधिकारी,
डोंबिवली

✲ **अंबरनाथ शाखा -**
१०१ व १०२, साकेत अपार्टमेंट, पहिला माळा,
वडवली विभाग, अंबरनाथ (पू.), जि. ठाणे.
फोन : २६०९७९०

✲ **बदलापूर शाखा -** ५ व ६, २ रा मजला, अंकूर अपार्टमेंट, आंबामाता मंदिराजवळ, महावीरनगर,
बदलापूर (प.) फोन : २६७१४११.

✲ **डोंबिवली शाखा -**
सुनेत्रा को. ऑ. हौ. सो., सम्राट चौक,
डोंबिवली (प.) फोन : २४८०७०८.

✲ **कल्याण शाखा -** अन्नपुर्णा को.ऑप. हौ. सोसायटी,
पहीला माळा, कल्याण-मुरबाड रोड,सिंडीकेट, कल्याण (प.)
फोन : २३२८५९३.

✲ **टिटवाळा शाखा -** ममता १३५१, ममता बूक डेपो समोर, मांडा-टिटवाळा (पू.) फोन : २३८२२४१.

✻ प्रगतीचा दृष्टीक्षेप ✻

(रुपये कोटीमध्ये)



महालक्ष्मी मुदत ठेव

३० दिवस ते ९० दिवस - ०५.०० %
९१ दिवस ते १८० दिवस - ०६.०० %
१८१ दिवस ते २७० दिवस - ०९.०० %
२७१ दिवस ते १ व[illegible] - ०९.५० %

१५ महिने ते २१ महिनेपर्यंत - १०.०० %
२१ महिन्यांपेक्षा जास्त ते ३६ महिने - १०.२५ %
३६ महिन्यांपेक्षा जास्त ते ६० महिने - ०९.०० %

महा[illegible]क मिळकत ठेव

१ वर्ष - [illegible].०० %
२ वर्ष - १०.५० %
३ वर्ष - ११.०० %

महालक्ष्मी मासिक ठेव

१ वर्ष - ०७.५० %
२ वर्ष - ०८.०० %
३ वर्ष - ०८.५० %

महालक्ष्मी जनविकास ठेव

१ वर्ष - १०.०० %
२ वर्ष - १०.५० %
३ वर्ष - ११.०० %

दैनंदिन ठेव

१ वर्ष - ५ % ✻ ६ महिने - ४ %

महालक्ष्मी बाल विकास ठेव

६१ महिने - ०९.०० %
७३ महिने - ०९.५० %
७ वर्षे - १०.०० %
८ वर्षे - ११.०० %
९ वर्षे - ११.५० %
१० वर्षे - १२.०० %

प्रेषक -
श्री महालक्ष्मी नागरी सह. पतपेढी मर्या., अंबरनाथ
१०१ व १०२, साकेत अपार्टमेंट, पहिला माळा,
वडवली विभाग, अंबरनाथ (पू.), जि. ठाणे - ४२१ ५०१.
दूरध्वनी क्र. : २६०९७९०
ई-मेल : shrimahalaxmipatpedhi@gmail.com

प्रति -
श्री./सौ. ____________________
____
____